# रहेजा क्यूबीई जनरल इन्शुरन्सकडून कोरोना कवच पॉलिसी सादर

मुंबई,: रहेजा क्यूबीई जनरल इन्शुरन्स (आरक्यूबीई)ने नुकतेच 'कोरोना कवच' पॉलिसी सादर केली. ही नवीन आरोग्य पॉलिसी कोविड-१९ साठी उपचार घेणा-या व्यक्तींना हॉस्पिटलमध्ये येणा-या वैद्यकीय खर्चांसाठी विमा संरक्षण देते. स्वत: व्यक्ती, पती/पत्नी, आईवडिल, सासू-सासरे आणि अवलंबून असलेली मुले यांच्यासाठी या पॉलिसीचा लाभ घेता येऊ शकतो.कोरोना कवच पॉलिसी कोविड संबंधित हॉस्पिटल खर्चासाठी संरक्षण देते, ज्यामध्ये हॉस्पिटलमध्ये भरती होण्यापूर्वी आणि नंतरचा खर्च, होम-केअर उपचार, रूग्णवाहिका व आयुष उपचार यांचा समावेश आहे. या उत्पादनामध्ये ॲड ऑन कव्हरचा (अतिरिक्त प्रिमियम भरल्यास उपलब्ध) समावेश आहे. याअंतर्गत पॉलिसीधारकांना हॉस्पिटलमधील रोजच्या रोख खर्चांसाठी देखील दररोज निश्चित रक्कम देण्यात येईल, जी पॉलिसी कालावधीदरम्यान अधिकतम १५ दिवसांसाठी प्रतिदिन विमाकृत राशीच्या ०.५ टक्के असेल. हे पॉलिसी कव्हरेज साडेतीन महिने, साडेसहा महिने व साडेनऊ महिने या कालावधीसाठी उपलब्ध आहे.